REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# सोलापूर विद्यापीठ संलग्न आंतरमहाविद्यालयीन तालुकानिहाय क्रीडा स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागचा विश्लेषणात्मक अभ्यास

Ramhari Shivaji Nagtilak[1] and Dr. Sharad Aher[2]
[1]Lecturer in Physical Education , Shri Shivaji Mahavidyalaya, Barshi Dist: Solapur [MS].
[2] Assistant Professor , Chandrashekhar Agashe College of Physical Education, Pune , Dist: Pune [MS]

## प्रस्तावना



जागतिक पातळीवर शारीरिक शिक्षण या विषयाचे महत्व अनन्य साधारण आहे. प्रत्येक विद्यापीठात तसेच शाळेमध्ये शारीरिक शिक्षण या विषयाला महत्व देण्यात आलेले आहे. आपल्या आरोग्या संदर्भात योग्य काळजी घेण्यासाठी या विषयाच्या माध्यमातून दैनेदिन व्यायामाचे महत्व सांगीतले जाते. त्यासाठी विद्यापीठ तसेच शालेय स्तरावर शिक्षण घेत असताना अधिकाधिक विद्यार्थ्यांनी मैदानावर जाऊन खेळात सहभाग घेणे आवश्यक आहे. विद्यापीठ स्तरावर त्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. अशा स्पर्धामध्ये विद्यापीठ स्तरांवर किती विद्यार्थी सहभाग घेतात, त्यांचा खेळाच्या बाबतीत कसा दृष्टीकोन आहे. हे जाणणे गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधनात विद्यापीठ स्तरावर महाविद्यालयामध्ये तालुकानिहाय क्रीडा स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागचा विश्लेषणात्मक अभ्यास केला आहे. या संशोधनामुळे विद्यार्थी शिक्षक समन्वयक यांचा खेळाविषयीचा दृष्टीकोन समोर येतो. सहभाग न घेण्याचे कारण देखील या संशोधनामुळे समोर येते. या संशोधनामुळे तालुकानिहाय क्रीडा स्पर्धेमध्ये कोणत्या स्तरावरती कोणत्या खेळाडूंनी व किती खेळाडूंनी यश मिळवीले आहे किंवा सहभाग घेतला आहे. हे समजते. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सोलापूर विद्यापीठमधील बार्शी तालुका हे कार्यक्षेत्र निवडले आहे. या संशोधनाचा फायदा निश्चितच विद्यार्थी, खेळाडू शिक्षक, समन्वयक व अधिकारी यांना होईल.

## समस्या विधान

**सोलापूर विद्यापीठ संलग्न आंतरमहाविद्यालयीन तालुकानिहाय क्रीडा स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागचा विश्लेषणात्मक अभ्यास**

## संशोधनाची उद्दिष्टे

- विद्यार्थ्यांचा क्रीडा स्पर्धेमधील सहभाग किती प्रमाणात आहे याची माहिती घेणे.
- आंतरमहाविद्यालय स्पर्धेमध्ये व आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये त्या शैक्षणिक वर्षात किती खेळाडू स्पर्धात सहभागी होतात याची माहिती घेणे.
- आंतरमहाविद्यालय स्पर्धेमध्ये किती महाविद्यालये सहभागी होतात याची माहिती घेणे.

## संशोधनाची परिसिमा

- हे संशोधन फक्त सोलापूर विद्यापीठापुरतेच मर्यादित होते.
- प्रस्तुत संशोधन हे फक्त सोलापूर विद्यापीठातील मान्यताप्राप्त महाविद्यालयातील बार्शी तालुकानिहाय स्पर्धेमधील सहभागपुरतेच मर्यादित होते
- आंतरमहाविद्यालय व आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेमध्ये खेळल्या जाणाऱ्या खेळाचा विचार केला होता.
- प्रस्तुत संशोधनात मागील सन २०१३-१४ ते २०१५-१६ या ०३ वर्षापर्यंतचा अभ्यास होता.

## मर्यादा

- प्रस्तुत संशोधनामध्ये खेळाडूंच्या सहभागाची माहिती ही महाविद्यालयाकडे, विद्यापीठाकडे असणाऱ्या दस्तऐवजावरच (रेकॉर्ड) अवलंबून आहे.
- मिळणाऱ्या माहितीची सत्यता पडताळून पाहता येत नाही ही संशोधनाची मर्यादा

होती.

- मुलाखती दरम्यान प्रतीसादकाची मानसिक स्थिती ही संशोधनाची मर्यादा होती.

### संशोधनाचे महत्व

- विद्यापीठातील क्रीडा विभागातील व्यक्तींना मार्गदर्शन माहितीत्व उपयोग होईल.
- महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालकांना व शारीरिक शिक्षण सहाय्यक प्राध्यापकांना उपयोग होईल तसेच संस्था चालकांना, खेळाडू, विद्यार्थी यांना उपयोग होईल.

### संशोधन कार्यपध्दती

#### १. संशोधन पध्दती

सदरचे संशोधन वर्तमान काळाशी निगडीत असल्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील निरीक्षण अभ्यास प्रकारातील अलीप्त निरीक्षण यामधील प्रकृतिवादी निरीक्षण पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

#### २. संशोधनाची साधने

सदरच्या संशोधनासाठी संशोधकाने मुलाखतीचा वापर केला आहे.

#### ३. संख्याशास्त्रीय साधने

प्रस्तुत संशोधनासाठी संकलित केलेल्या सामुग्रीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी व आलेखाचा वापर केला आहे.

#### ४. नमुना निवड

प्रस्तुत संशोधनासाठी सोलापूर विद्यापीठातील मान्यताप्राप्त महाविद्यालयातील फक्त बार्शी तालुका खेळाडू मुलांचाच विचार सहेतुक नमुना पध्दतीने निवड केली आहे.

### माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

संशोधकाने संशोधन करताना प्राप्त माहितीचे संकलन करुन निवड साधनांव्दारे अर्थनिर्वचन केले आहे..

**कोष्टक क्र. ०१**

**सोलापूर विद्यापीठ संलग्न आंतरमहाविद्यालयीन तालुकानिहाय स्पर्धेमधील सहभाग दर्शविणारे कोष्टक**

**बार्शी**

| सन | एकूण विद्यार्थी | खेळाडू | शेकडा |
|---|---|---|---|
| २०१३-१४ | ५४०९ | ५१६ | ९.५४ |
| २०१४-१५ | ५८२६ | ५६२ | ९.६५ |
| २०१५-१६ | ५९४२ | ५४९ | ९.४६ |

### विश्लेषण

वरील कोष्टक क्रमांक ०१ वरुन असे दिसून येते की, बार्शी मधील सन २०१३-१४ तालुकानिहाय स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचे ९.५४ टक्के प्रमाण आहे. सन २०१४-१५ तालुकानिहाय स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचे ९.६५ टक्के प्रमाण आहे. सन २०१५-१६ तालुकानिहाय स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचे ९.४६ टक्के प्रमाण आहे.

## अर्थनिर्वचन

सन २०१३-१४ ते २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये बार्शी तालुकानिहाय स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचे सर्वात जास्त ५६२ विद्यार्थी २०१४-१५ शैक्षणिक वर्षामध्ये सहभागी झाले. त्यांचे प्रतिशत प्रमाण ९.६५ टक्के एवढे आढळले तर सर्वात कमी ५१६ विद्यार्थी २०१३-१४ शैक्षणिक वर्षामध्ये आढळले त्यांचे शेकडा प्रमाण ९.५४ टक्के एवढे दिसून येते.

## संशोधनाचे निष्कर्ष

विद्यार्थ्यांचा या खेळामध्ये अधिक सहभाग असतो. त्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

१. महाविद्यालयामध्ये खेळाडूंना आधूनिक क्रिडा साहित्य मुबलक व पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन दिले जाते त्यामुळे विद्यार्थी खेळात सहभाग घेतात.
२. महाविद्यालयांना प्रशस्त असे मैदान उपलब्ध असल्याने व त्याची व्यवस्था चांगली ठेवल्याने विद्यार्थी खेळामध्ये सहभाग घेतात.
३. खेळाडूंसाठी योग्य असे क्रीडा प्रशिक्षक उपलब्ध आहेत. त्यामुळे खेळाडूंना योग्य असे मार्गदर्शन मिळते. प्रेरणा मिळते म्हणून ते खेळात सहभाग नोंदवतात.
४. खेळाडूंसाठीच्या असणाऱ्या सुविधा उदा. आहार, प्रवास भत्ता, क्रीडा साहित्य वैद्यकीय उपचार इत्यादीची सोय योग्य प्रकारे केली जाते. म्हणून विद्यार्थी अधिक प्रमाणात खेळामध्ये सहभाग घेतात.

## विशिष्ट खेळामध्ये कमी सहभाग असण्याची कारणे

१. प्रवासाची गैरव्यवस्था असल्याकारणाने देखील विद्यार्थी सहभाग नोंदवत नाहीत.
२. आधुनिक क्रीडा साहित्य आपुरे असल्यामुळे देखील काही विशिष्ट खेळामध्ये विद्यार्थी सहभाग घेत नाहीत.
३. वैद्यकीय उपचार योग्य प्रशिक्षक यांची कमतरता जाणवते त्यामुळे देखील विद्यार्थी सहभाग घेत नाहीत.

## समारोप

अशाप्रकारे प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाच्या मर्यादा, संशोधनाचे महत्व, संशोधन पध्दती, नमुना निवड, संशोधनाची साधने, संख्याशास्त्रीय साधने, माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन या मुद्यांचा आढावा घेतलेला आहे. तसेच संशोधन कार्याच्या उद्दिष्टानुसार निष्कर्ष, याचा ही आढावा घेतलेला आहे.

## संदर्भग्रंथ सूची:

आगलावे, प्रदिप (२०००), संशोधन पध्दती व तंत्रे, नागपूर: विद्या प्रकाशन
कुलकर्णी प.वि., प्रभुणे पद्मजा (२००६), वर्णनात्मक सांख्यिकी, नागपूर : विद्या प्रकाशन
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर १२ वा वार्षिक अहवाल सन (२०१५-१६)
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर ११ वा वार्षिक अहवाल सन (२०१४-१५)
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर १० वा वार्षिक अहवाल सन (२०१३-१४)
मुळे व उमाठे, (1987) ***शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे*** : (दुसरी आवृत्ती.) नूतन प्रकाशन. पुणे